महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
फोन नं. ०२२-२२६२०६६८, ६९, ७० फॅक्स: ०२२-२२६२०७८९ संकेत स्थळ: www.gdcmumbai.org


क्र.शादंमरुमुं/खरेदी विभाग/गणवेष/ ५९६ /२०१९ दिनांक :३० /०१/२०१९

**प्रति,**
मे.........

विषय :- शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयाच्या अखत्यारीतील कार्यरत सुरक्षारक्षकांना गणवेषावर लावण्याकरीता लागणाऱ्या विविध बाबी खरेदी करणेबाबत.

संदर्भ :- या कार्यालयाच्या दिनांक २९/०१/२०१९ रोजीची मान्य टिप्पणी.

उपरोक्त विषयान्वये नमूद केल्यानुसार खालील प्रमाणे नमूद सुरक्षरक्षकांच्या गणेवेपा करीता आवश्यक बाबी खरेदी करण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर प्रक्रियेत सहभागी होण्यास इच्छुक असल्यास खालीलप्रमाणे नमूद बाबींचे दरपत्रक कार्यालयात दि. ०६/०२/२०१९ पुर्वी सादर करावेत. उशिरा आलेली दरपत्रके स्विकारली जाणार नाहीत.

| अनु.क्र. | तपशील | मागणी |
|---|---|---|
| १ | टोपी | ८ |
| २ | बेल्ट | ८ |
| ३ | अशोकचक्र बटन | ८ |
| ४ | अशोकचक्र चिन्ह | ८ |
| ५ | वॉचमेन रस्सी | ८ |
| ६ | शोल्डर जोड | १६ जोड (३२ नग) |
| ७ | शिटी | ८ |
| ८ | चांमडयाचे बुट क्र. ७,८,९,१० | ८ जोड |
| ९ | मोजे (जोडी) | १६ जोड (३२ नग) |

वर दर्शविल्याप्रमाणे दरपत्रकेचा अनुक्रमांक व तारीख आणि बाबीचे नाव प्रती नग दर उल्लेखित केलेल्या मोहोरबंद लिफाफयातून पूर्ण भरलेल्या दरपत्रक अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई - ४००००१ या कार्यालयात दि.०६/०२/२०१९ रोजी दुपारी ४:०० वाजेपर्यन्त स्विकारल्या जातील. व दरपत्रकेचा सिलबंद लिफाफा खरेदी समिती समोर दि.०७/०२/२०१९ रोजी सकांळी ११.०० वाजता उघडण्यात येतील आपणांस जर दरपत्रके उघडण्याच्या प्रक्रियेमध्ये भाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहवे.

Tapukam

**अधिष्ठाता**
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई

**अटी व शर्ती :-**

१) सदर दरपत्रक सिलबंद पाकीटावर विषय ठळकपणे नमुद करावे.
२) सदरील दरपत्रक अधिकृत लेटरहेड वर सादर करावे. त्यासोवत व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी नंबरची किंवा तत्सम प्राधिकरणाची नोंदणी प्रमाणपत्र झेरॉक्स प्रत तसेच पॅनकार्डची प्रत, औषधीद्रव्ये विभागाची वैध मान्यता/परवानगी प्रमाणपत्र सदर सामुग्री पुरवठा करण्यास कंपनीने प्रधिकृत व वैध प्रमाणपत्र माहितीपत्रक (कॅटलॉग) इ. माहिती सादर करणे करण्यात यावे.
३) प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल.
४) दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावाच्या अधिन राहून असावेत. सदरचे वस्तूची निव्वळ किंमत व इतर सर्व कर हे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. तसेच उपरोक्त काम हे पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून जास्तीत जास्त आठ (०८) दिवसांत पुरवठा करण्यात यावे. सदरील बाबींचा पुरवठा करण्यास विलंब झाल्यास देकामधून नियमानुसार दंड वसूल करण्यात येईल.
५) सदर कामासाठी शासनाचे दरकरार उपलब्ध झाल्यास सदरील भरण्यात आलेले दरपत्रके वगळण्यात येतील यांची नोद यावी,
६) संबंधितकडून दंतसामुग्री संबधित मागील अनुभव असल्यास त्याची प्रत सोबत साक्षांकित करुन देण्यात यावे.
७) दरपत्रक वरील यंत्राचा हमी (वॉरंटी) कालावधी नमूद करावा. तसेच सदर वस्तुचे नमुने तपासणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.
८) शासकीय दुसर व चौथा शनिवार व रविवार, तसेच जोडुन आलेली सार्वजनिक सुटया वगळुन दरपत्रके सादर करण्यात यावे यांची नोंद घ्यावी. दरपत्रक पोस्टाने पाठविलेले स्विकारल्या जाणार नाहीत.
९) दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, मुंबई यांना आहे.
१०) ज्या पुरवठादारांनी उपरोक्त बाबींच्या पुरवठयाकरीता कमीत कमी दर आकरले असेल त्यांना दरपत्रकाचे आदेश निर्गमीत करण्यात येतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.
११) सविस्तर अटी व शर्ती वाचूनच दरपत्रके भरण्यात यावेत.